# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २९/१५ मध्ये निशाणी ६० खालील आदेश

.........

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ व ९ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ अन्वये कैफियतीमध्ये सुधारणा करणेकामी दाखल.

२. अर्जातील संक्षीप्त कथन असे की, प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून तुटक कब्जा मिळणेकरता दाखल आहे. प्रतिवादी क्र. ४ व ९ यांनी कैफियत दाखल करताना नजरचुकीने व टंकलेखानाच्या चुकीमुळे प्रतिवादींचे हिस्सेवारी चुकीची नमूद केलेली आहे. प्रतिवादींना दावा मिळकतींमध्ये त्यांच्या योग्य हिश्याची हिस्सेवारी प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रस्तावित सुधारणेमध्ये दावा मिळकत जमीन गट नं. ४४८५, ४४९०, ४४९६ व ४५०४ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा १० आणे हिस्सा असून त्यांना १० आणे क्षेत्राची कुळ कायद्याअंतर्गत विक्री झालेली असून वादी व प्रतिवादी क्र. १२ यांचा २ आणे, प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांचा २ आणे व प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांचा २ आणे असे हिस्से असून उर्वरित मिळकती म्हणजेच अ.क्र. १ ते ४ व ९ या मिळकतीमध्ये प्रत्येकी ४ आणे हिस्सा आहे. तसेच प्रस्तावित सुधारणेमध्ये दावा मिळकती अ.क्र १ ते ४ व ९ मध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांचा १/४ हिस्सा, प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांचा १/४ हिस्सा व दावा मिळकत अ.क्र. ५ ते ८ मध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ८ याचा २ आणे हिस्सा व प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांचा २ आणे हिस्सा असून तसे वाटप प्रतिवादींना मिळावे असे नमूद आहे. थोडक्यात, दावा मिळकतींमध्ये प्रतिवादींची कैफियतीमध्ये नमूद असलेली हिस्सेवारी टंकलेखनाच्या दोषामुळे चुकीची लिहीलेली असून ती प्रस्तावित सुधारणेद्वारे कैफियतीमध्ये योग्य प्रकारे नमूद करण्यात यावी असे कथन करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित सुधारणेद्वारे मूळ कैफियतीमध्ये अगर दाव्यामध्ये कोणताही बदल होत नसून प्रस्तावित सुधारणेद्वारे वादींवर कोणताही अन्याय होणार नाही. पर्यायाने, प्रस्तुतचा प्रस्तावित सुधारणेचा अर्ज मंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

३. प्रस्तुतच्या अर्जाला वादीतर्फे म्हणणे सादर करताना त्यातील नमूद करणास्तव अर्ज नामंजूर करण्याची मागणी करण्यात आली. प्रतिवादी क्र. ४ व ९ चे सर्व आक्षेप फेटाळण्यात आले. वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर दाव्याची सुनावणी चालू झाली असून आता या टप्प्यावर प्रतिवादींना त्यांच्या कैफियतीमध्ये सुधारणा करता येणार नाही असे कथन करण्यात आले. तसेच वाटपाच्या दाव्यात योग्य ती हिस्सेवारी पक्षकारांना प्राप्त होत असल्यामुळे पुन्हा प्रस्तावित सुधारणा मंजूर करण्यास कोणतेही प्रयोजन रहात नाही असे कथन करण्यात येवून अर्ज नामंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

४. वरील दोन्ही बाजूचे कथन लक्षात घेता अर्जाच्या निकाल निश्चितीकरीता खालील

मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष त्या त्या कारणमिमांसेवर विसंबून दिलेले आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित सुधारणेचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते का ? | ... | होय. |
| २. | आदेश कोणते ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क. १ बाबत** :—

५. दोन्ही बाजुंच्या सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरून असे दिसून येते की दाव्याचे सुनावणीस प्रारंभ झालेला आहे. वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल आहे. परंतु अद्याप वादीची उलटतपासणी सुरू झालेली नाही. वाटपाच्या दाव्यामध्ये हिंदु वारसा कायद्याच्या तरतुदी अन्वये सहदायक या नात्याने पक्षकारांना प्राप्त झालेल्या स्थानाप्रमाणे दावा मिळकतींमध्ये हिस्सेवारी प्राप्त होत असते याविषयी दुमत नाही. परंतु निश्चितच प्रतिवादींना त्यांच्या कैफियतीमध्ये त्यांची योग्य ती हिस्सेवारी नमूद करण्याचा हक्क रहातो. तो कोणत्याही परिस्थितीत डावलता येत नाही. दाव्याचे सुनावणीस प्रारंभ झाला आहे याविषयी दुमत नाही. परंतु दाव्यातील पक्षकारांचे दरम्यान असलेले खरे प्रश्न निकाली करण्याकरता व दावा पूर्णार्थाने निर्णित करण्याकरता आवश्यकता असेल तर प्रस्तावित सुधारणेच्या मजकुरास मंजूरी देणे न्यायोचित ठरते. कैफियतीमध्ये प्रस्तावित सुधारणेचा मजकुर समाविष्ट करण्यास प्रतिवादीना संधी दिल्यास प्रतिवादींचेच नव्हे तर वादीचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींचे कथनांचे खंडण करण्याची संधी निश्चितच वादींना दाव्याचे सुनावणीकामी उपलब्ध आहे. पर्यायाने, प्रस्तावित सुधारणेचा अर्ज मंजूर झाल्यास वादींवर कोणताही अन्याय होणार नाही.

६. प्रस्तावित सुधारणेचा मजकुर पहाता प्रतिवादी कोणतीही नवीन अशी केस मांडत नाहीत. त्यामुळे दाव्याचे मूळ स्वरूपात, अनुतोषात कोणताही बदल संभावित नाही. तसेच मूळ कैफियतीच्या स्वरूपामध्ये देखील कोणताही बदल होत नाही. प्रतिवादींनी केवळ कैफियतीमध्ये पूर्वी नमूद केलेल्या हिस्सेवारीमध्ये काही प्रमाणात बदल हा प्रस्तावित सुधारणेमध्ये मागितला आहे. पर्यायाने, प्रस्तावित सुधारणेद्वारे प्रतिवादी हे कोणतीही नवीन केस घेवून पुढे येत आहेत असे म्हणता येणार नाही. त्याचवेळी प्रस्तावित सुधारणेच्या मजकुरास अभिलेखावर सादर करण्यास झालेल्या विलंबाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. दाव्याचे सुनावणीस प्रतिवादींच्या या कृत्यामुळे विलंब झालेला आहे हे नाकारता येत नाही. पर्यायाने, प्रतिवादींवर योग्य तो खर्च

लादणे न्यायोचित ठरते. सबब, न्यायाचे कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. ४ व ९ ने मूळ कैफियतीमध्ये प्रस्तावीत सुधारणेचा मजकुर आज रोजी अगर दाव्याचे सुनावणीचे पुढील तारेखेपर्यंत समाविष्ट करून तशी सुधारीत कैफियतीची प्रत दाव्याचे अभिलेखावर सादर करावी.

३. सदरची पूर्तता करणेस प्रतिवादी क्र. ४ व ९ अपयशी ठरल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १८ प्रमाणे पुढील आदेश पारीत केले जातील.

४. प्रतिवादी क्र. ४ व ९ यांनी वादीला खर्चाची रक्कम म्हणून रूपये २००/— (दोनशे मात्र) अदा करावेत.

( रा.म.चौत्रे )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

दिनांक :— १७/०३/२०१७

<u>कणकवली</u>